# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी-९, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी क. २६४७ २१३१ / २६४७ ४२११

जा.क्र. : काऔसंवि/ब/गटविमापॉलिसी/ ३५१४३ दिनांक : १७/११/२००९

## परिपत्रक

विषय : महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना गट विमा योजनांतर्गत अपघात विमा योजना लागू करण्याबाबत.

सर्वसाधारण आदेश क. २० (क) दि. १७ जुलै १९६३ मधील तरतुदीनुसार अस्तित्वात असलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना, कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना कर्मचारी कल्याण निधी मार्फत देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व कामावर असताना अपघात झाल्यास कर्मचाऱ्याला देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना इत्यादीव्यतिरिक्त महावितरण कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांना गट विमा योजनांतर्गत 'अपघात विमा योजना' लागू करण्याबाबतचा निर्णय कंपनीने घेतला आहे आणि त्याप्रमाणे युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी मर्यादित, पुणे रिजनल ऑफीस, ५वा मजला, भारती विद्यापीठ भवन, लाल बहादूर शास्त्री भवन, नवी पेठ, पुणे ४११ ०३० या विमा कंपनी बरोबर करार करण्यांत आला आहे.

**<u>अपघात विमा योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :</u>**

१) अपघात विमा योजनेचा पॉलिसी कं. १६०८०१/४२/०९/०५/०००००५५९ असा आहे.

२) विम्याचा हप्ता संपूर्णपणे कंपनीतर्फे भरण्यात आला आहे.

३) विमा पॉलिसीचा कालावधी दि. १७/११/२००९ पासून दि.१६/११/२०१० च्या मध्यरात्रीपर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

४) कर्मचाऱ्याच्या विमा पॉलिसीची रक्कम प्रत्येकी रु. २,००,०००/- इतकी राहील.

५) कर्मचाऱ्याची सेवा निवृत्ती, राजीनामा, बडतर्फी इत्यादी कारणामुळे त्याची सेवा संपुष्टात आल्यास या योजने अंतर्गत त्याला लाभ घेता येणार नाही.

६) या विमा योजनांतर्गत कर्मचाऱ्याला खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देय राहील.

| | | |
|---|---|---|
| अ) मृत्यु झाल्यास | - | १०० टक्के |
| ब) कायमचे अपंगत्व आल्यास | - | १०० टक्के |
| क) दोन हात / दोन्ही डोळे / एक हात व एक डोळा गमावल्यास | - | १०० टक्के |
| ड) एक हात / एक डोळा गमावल्यास | - | ५० टक्के |
| इ) अपघाताने अंशतः कायमचे अपंगत्व आल्यास | - | अपंगत्वाच्या प्रमाणानुसार कर्मचाऱ्याला नुकसान भरपाई दिली जाईल. |
| ई) तात्पुरत्या स्वरुपाचे अपंगत्व आल्यास | - | साप्ताहिक वेतनाच्या १ टक्के याप्रमाणे कमाल १०० आठवडे |

कर्मचाऱ्याच्या सेवा कालावधीत अपघात झाल्यास या पॉलिसी अंतर्गत नुकसान भरपाईचा दावा अपघात झाल्यापासून एक महिन्याच्या आत संपूर्ण कागदपत्रांच्या पूर्ततेसह विमा कंपनीला सादर करणे बंधनकारक आहे. कर्मचाऱ्यांचे अशा प्रकारचे दावे कार्यकारी अभियंता किंवा तत्सम दर्जाचे किंवा त्यापेक्षाही वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी मर्यादित, शाखा कार्यालय कॅम्प पुणे, अरोरा टॉवर्स, ४१३ एम.जी.रोड, पुणे वेस्ट विंग, कॅम्प पुणे, महाराष्ट्र - ४११००१ यांचेकडे सादर होणे आवश्यक आहे.

विमा कंपनीला कर्मचाऱ्याचा दावा आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत विमा कंपनीने नुकसान भरपाईची रक्कम कर्मचाऱ्याला / त्याच्या कायदेशीर वारसांना परस्पर अदा करावयाची आहे.

सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांचे गट विमा योजना अंतर्गत प्राप्त झालेले दावे त्या-त्या स्तरावर पूर्ण छाननी करुन परस्पर विनाविलंब विमा कंपनीकडे पाठवावे. असे असले तरी कर्मचाऱ्याचा परिपूर्ण दावा कोणतीही सबब न सांगता १५ दिवसाच्या आत सादर करणे संबंधित कार्यालयावर बंधनकारक आहे. या विहित कालावधीमध्ये असे दावे विमा कंपनीकडे सादर न झाल्यास संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यास जबाबदार धरुन भरपाईची रक्कम त्यांच्याकडून वसूल केली जाईल, शिवाय त्यांच्याविरुध्द कार्यालयीन शिस्तभंगाची कडक कारवाई देखील केली जाईल. परिपत्रकातील सर्व सूचनाचे काटेकोरपणे पालन करावे. सदर परिपत्रक आपल्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(signature)

**कार्यकारी संचालक (मा.सं.)**

प्रति

कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्यांपर्यंत

प्रत माहितीसाठी सादर :

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

२) संचालक (संचलन), म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

३) संचालक (वित्त), म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

४) कार्यकारी संचालक (प्रकल्प) प्रादेशिक कार्यालय मुंबई.

D:\D Drive\insurance\apghat vima yojana paripatra.doc